**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)**
**जनसंपर्क विभाग**

---

# नवनियुक्त कुलसचिव डॉ. तुषार देशमुख विद्यापीठाच्या कुलसचिव पदी रुजु

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे नवनियुक्त कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी आज कुलसचिव पदाचा पदभार माजी कुलसचिव श्री डी.एस. राऊत यांचेकडून स्वीकारला. त्यांची पाच वर्षाकरीता कुलसचिव म्हणून नियुक्ती झाली आहे. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर यांनी नवनियुक्त कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांचे पुस्तक देवून स्वागत केले. यावेळी व्य.प. सदस्य डॉ. प्रदीप खेडकर, डॉ. प्रफुल्ल गवई, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एफ.सी. रघुवंशी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.डी.डब्ल्यु. निचित, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख, आय.आय.एल.चे संचालक डॉ.डी.टी. इंगोले, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. दिनेश सातंगे, रा.से.यो. प्रभारी संचालक डॉ. राजेश बुरंगे, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ.एस.के. ओमनवार, अधिसभा सदस्य डॉ. मनिष गवई, कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, उपकुलसचिव (लेखा) डॉ. नितीन कोळी, उपकुलसचिव (भांडार) डॉ.डी.आर. चव्हाण, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच अधिकारी, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

डॉ. तुषार देशमुख यांनी अमरावती विद्यापीठामधून बी.ई., एम.ई. व एम.बी.ए. केले असून व्ही.एन.आय.टी. नागपूर मधून ‘अ कस्टम बोन इम्पॅनटेशन युझिंग रॅपिड प्रोटोटायपिंग’ विषयावर पीएच.डी. केली आहे. अमरावती विद्यापीठात मेकॅनिकल इंजिनिअरींग, प्रोडक्शन इंजिनिअरींग व गोंडवाना विद्यापीठात मेकॅनिकल इंजिनिअरींग विषयाचे ते पीएच.डी. चे मार्गदर्शक आहेत. त्यांनी अमरावती विद्यापीठात अभ्यास मंडळ, फॅकल्टी, विद्या परिषद, बोर्ड ॲण्ड युनिव्हर्सिटी टिचर, रिसर्च ॲण्ड रिकग्निशन कमिटी, इक्विव्हॅलन्स कमिटी आदी समित्यांवर काम केले आहे.

त्यांचे एकूण ५४ शोधनिबंध प्रकाशित झाले असून आंतरराष्ट्रीय स्तरावर जर्नल्समध्ये ३९, राष्ट्रीय स्तरावर जर्नल्समध्ये २, आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये ५, राष्ट्रीय परिषदांमध्ये ८ पेपर प्रकाशित झाले असून ‘टायटल ऑफ इन्व्हेन्शन : इरगॉनॉमिक सिवींग वर्कस्टेशन’ यावर त्यांचे पेटेन्ट सुद्धा प्रकाशित झाले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी आचार्य पदवी करीत आहे.

नवनियुक्त कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांचे निवडीबद्दल त्यांचे सार्वत्रिक अभिनंदन होत आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. २०/०५/२०१९.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी